# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/०२/२०२६ (बुधवार )**

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची विक्री करीता साठवणुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद, ५ लाख ५३ हजार ६५० रूपयांचा मूद्देमाल जप्त, रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक २४/०२/२०२६ रोजी रामटेक पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, मौजा खुमारी येथे प्रकाश कामडे, रा.खुमारी याने त्याच्या शेतातील घरामध्ये महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखु विक्री करीता साठा करून ठेवला आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा खुमारी येथे आरोपी क्रं १) प्रकाश कामडे, वय ४५ वर्षे, रा.खुमारी याच्या शेतात जावुन पंचासमक्ष आरोपीच्या घराची घरझडती घेतली असता महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **पोलीसांनी पंचासमक्ष एकुण ३०० किलो प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु, टिन पँकींग मशिन, प्लास्टीक व कागदी पँकीग चे साहीत्य असा एकुण किंमती ५,५३,६५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच आरोपी क्रं २) आशिष रोकडे, रा नागपुर याने सदर मशिन, प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुचा आणि साहीत्याचा पुरवठा केला असुन हे साहीत्य त्याचेच मालकीचे असल्याची माहीती प्राप्त झाली.**

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा केला होता. आरोपी प्रकाश कामडे, वय ४५ वर्षे, रा.खुमारी आणि आशिष रोकडे रा. नागपुर यांचेविरूद्ध पोस्टे रामटेक येथे कलम २६(१),२६(२),(iv) २७(३)(e), ३०(२)(a),३(१)(zz)(iv),५९ अन्न सुरक्षा आणि मानके

अधि. २००६ सहकलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **आरोपीला अटक करण्यात आली आहे.**




## पोलीस ठाणे कळमेश्वर हद्दीतील मौजा गोंडखैरी येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या ०५ आरोपीतांविरूद्ध ०५ गुन्हे नोंद ०२ लाख ९ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक २३/०२/२०२६ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, मौजा गोंडखैरी शिवारात मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच कळमेश्वर पोलीसांनी

घटनास्थळी जावुन कारवाई केली असता **०५ महिला आरोपी या** मोहाफुल सडवा आणि दारू गाळण्याच्या साहीत्यासह हातभट्टी लावुन दारू गाळतांना मिळुन आल्या. नमुद हातभट्टया नष्ट करून मुद्देमाल जप्त केला.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) ५०२० लिटर मोहाफुल सडवा रसायन ,२) १६० लिटर मोहाफुल गावठी दारू ३) लोखंडी ड्रम, प्लास्टिक ड्रम इतर साहित्य असा एकुण २,०९,१००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट केला. नमुद ५ महीला आरोपीतांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण ०५ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**



# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, रामटेक पोलीस यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक २५/०२/२०२६ रोजी रामटेक पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी नगरधन गावात जाणाऱ्या रोडवर आरोग्य विभाग केंद्रा जवळ नाकाबंदी केली असता एक ट्रॅक्टर क्र एम एच ४० बी जे ९२४३ आणि त्याला जोडलेली विनाक्रमांकाची ट्रॉली मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली. नमुद वाहनामध्ये रेती आढळुन आली. १) **वाहन चालक आरोपी रितीक सोमाजी शेंद्रे, वय २५ वर्षे, रा. मुसेवाडी ता रामटेक जि नागपुर** हा मिळुन आला. त्याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नव्हता. **आरोपी क्रं २) वाहन मालक गाते , रा. चिचदा ता रामटेक, जि. नागपुर** याच्या सांगणेवरून अवैधरित्या रेतीची अवैधरित्या वाहतुक करीत असल्याबाबत माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष ट्रॅक्टर क्र एम एच ४० बी जे ९२४३ आणि त्याला जोडलेली विनाक्रमांकाची ट्रॉली आणि १.५ ब्रास रेती असा एकुण किमती ९,१०,५०० /—पयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोस्टे रामटेक येथे कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०५ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ५० हजार ३०० रूपयांचा मुद्देमाल जप्त मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक २४/०२/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा निहारवानी येथील चौकात काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे मौदा पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) रषीक मुर्तीदास शेंडे, वय ३२ वर्ष, रा. ठाणा पेट्रोलपंप ता. जि.भंडारा २) साहील संजय बागडे, वय २१ वर्ष, रा. फुलमोगरा ता. जि. भंडारा ३) सारंग रामलाल गोस्वामी, वय २० वर्ष, रा. अशोक नगर फुलमोगरा, ता. जि.भंडारा ४) रोहीत आलाराम सुखदेवे, वय २३ वर्ष, रा. फुलमोगरा, ता. जि.भंडारा ५) लक्की किशोर बोरकर, वय २२ वर्ष, रा. अशोक नगर फुलमोगरा, ता. जि.भंडारा** यांना जागीच पकडले.

**पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तास पत्ते आणि रोख रक्कम ५,३००/—रूपये ०५ वेगवेगळया कंपनीचे मोबाईल किंमती ४५,०००/—रूपये असा एकुण ५०,३००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद ०५ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन मौदा येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १९ गुन्हे नोंद

दिनांक २४/०२/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, रसायन सडवा, तसेच इतर साहित्य असा एकुण २५४१६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १९ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे विनोद मनोहर मौदेकर, वय ४२ वर्ष, रा. वार्ड क्र ९, कुही याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे मनोज वसंता वनवे, वय ३६ वर्ष, रा. कारगाव ता. भिवापूर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे राकेश भाऊराव बावनगडे, वय ३२ वर्ष, रा. पचखेडी ता. कुही याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे आरोपी क्र. १) नामे अंकुश बाबजी बावने, वय ५१ वर्ष, रा. पचखेडी ता. कुही २) धनपाल उर्फ साधु तेजराम सोनबावने, वय ३३ वर्ष, रा. बोरीनाईक ता. कुही याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी क्र. १) मारोती

परसराम राऊत, वय ४५ वर्ष, रा. शेडेश्वर कॉलनी, ता. उमरेड जि. नागपूर २) साहील संजय रोडे, वय २६ वर्षे, रा.बेला ता उमरेड जि नागपुर ३) साहील बंडु नान्हे, वय ३२ वर्ष, रा. बेला ता. उमरेड जि. नागपूर यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा असे ३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी क्र. १) बंसिलाल काशिराम बिरणवार, रा. वार्ड क्र. १, नगरधन ता. रामटेक २) मनोज सुदाम उईके, वय ३३ वर्ष, रा. गुगलडोह ता. रामटेक यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा असे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे आरोपी नामे करण उकंडराव मसराम, वय २४ वर्ष, रा. बिछवा (टेकाडी) ता. सावनेर ह. मु. पारडी (अंबाझरी) ता. पारशिवनी यांचे वर एक गुन्हा, **पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी नामे अल्ताफ चांद शेख, वय ६३ वर्ष, रा. वार्ड क्र. ४, अरोली यांचे वर एक गुन्हा, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे चंद्रभान राजेश मरकाम, वय २६ वर्ष, रा. कटटा ता. रामटेक यांचे वर एक गुन्हा, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे गंगाधर चंपत निब्रट, वय ३५ वर्ष, रा. मेटपांजरा, ता. काटोल यांचे वर एक गुन्हा, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ०५ महिला आरोपी यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा, असे ५ गुन्हे नोंद, अशा आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १९ गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) १५९० लिटर मोहाफुल गावठी दारू २) ४४०० लिटर सडवा व इतर साहित्य ३) १६०१० मिली देशी दारू असा एकुण २,५४,१६०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**